CMYK

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 132 ■ सोमवार, दि. 23 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

भाजपा नेते देवानंद सानप यांचा त्यांच्या चाहत्यांकडून गरजवंत महिलांना किराणा किट व साडी चोळी वाटुन वाढदिवस साजरा >> पान 2

शिंदेंच्या कॉमन प्रतिमेसारखेच आमचेही ध्येय >> पान 3

कंटेनर कारवर पलटी होऊन भीषण अपघात; एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू >> पान 4

**सुविचार**

जीवन म्हणजे एक प्रवास आहे, नेहमी शिकत राहा.



शेवटी आशा भोसलेंची नात ती! प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरनेही घातली हटके मागणी

आतील पान

# मंत्रिपद, खातेवाटप अन् आता पालकमंत्री पदावरून रस्सीखेच

दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी : अखेरकार शनिवारी २१ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस सरकारचं खातेवाटप जाहीर झालंय. काही महत्त्वाची खाती भाजपाकडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला तर काही खाती शिवसेनेकडून भाजपाला देण्यात आलीत. विशेष म्हणजे अजित पवार अर्थ खाते आपल्याकडे ठेवण्यात यशस्वी झालेत, तर शिवसेनेकडे असलेले उत्पादन शुल्क खातेही अजित पवारांनी स्वत:कडे घेतलंय. परंतु खातेवाटपानंतर आता पालकमंत्रिपदावरून महायुतीत मोठ्या प्रमाणात रस्सीखेच बघायला मिळत आहे.**



विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळूनसुद्धा मु'यमंत्रिपदापासून खाते वाटपापर्यंत जवळपास महिन्याभराचा कालावधी गेलाय. त्यानंतर आता पालकमंत्रिपदावरून महायुतीत रस्सीखेच सुरू झालीय. बीडमध्ये पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे या दोन्ही भावा बहिणींनी मंत्रिपदं आपल्याकडे घेतल्यानंतर आता पालकमंत्रिपदासाठी आग'हाची भूमिका घेतलीय. पंकजा मुंडे यांचा मागच्या विधानसभा आणि त्यानंतर झालेल्या आताच्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाला होता. परंतु भाजपाकडून विधान परिषदेवर त्यांची वर्णी लावण्यात आल्यानंतर आता मंत्रिमंडळ विस्तारात त्यांच्याकडे पर्यावरण आणि हवामान बदल, पशुसंवर्धन खात्याची जबाबदारी देण्यात आलीय. तर शिंदे सरकारमध्ये कृषिमंत्रिपदाची जबाबदारी पार पाडणाऱ्या धनंजय मुंडे यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा, ग'ाहक संरक्षण खात्याची जबाबदारी देण्यात आलीय. तरीही बीडच्या पालकमंत्री पदासाठी या दोन्ही नेत्यांकडून परस्पर दावा केला जातोय.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून यापूर्वीसुद्धा अनेक वाद निर्माण झालेत. महाविकास आघाडी सरकारच्या दरम्यान रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद हे अदिती तटकरे यांच्याकडे होतं. तेव्हा शिवसेना आमदार भरत गोगावले, महेंद्र थोरवे आणि महेंद्र दळवी यांनी तटकरे विरोधात भूमिका घेतली होती. त्यानंतर महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर उदय सामंत यांच्याकडे रायगडचं पालकमंत्रिपद सोपवण्यात आलं. आता महायुतीत अजित पवार यांचा समावेश असल्याकारणाने रायगडच्या पालकमंत्रिपदावरून पुन्हा रस्सीखेच सुरू झालीय. त्यातच भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्रिपदावर दावा केला असल्याने हा पेच सोडवायला मुख्यमंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. यंदाच्या मंत्रिमंडळ विस्तारात अदिती तटकरे यांच्याकडे महिला आणि बालकल्याण हे खातं कायम ठेवण्यात आलं असून, भरत गोगावले यांना रोजगार हमी, फलोत्पादन, खारपाणपट्टा विकास हे खातं देण्यात आलंय. दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्री पदावर दावा केलाय.

## पुण्यात ६६९ कोटींचा सायबरफ्रॉड, ३८ हजार पुणेकरांच्या सायबर क्राईमकडे तक्रारी



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** शिक्षणाचे माहेरघर आणि आयटी हब अशी ओळख असणाऱ्या पुणे शहरात सायबर चोरट्यांनी धुमाकूळ घातलाय. मागील वर्षभरात सायबर चोरट्यांनी पुणेकरांचे ६६९ कोटी रुपये पळवले आहेत. याप्रकरणी तब्बल ३८ हजार पुणेकरांनी तक्रारी दिल्या आहेत. कधी दुप्पट पैसे देण्याचे आमिष, कधी पोलीस कारवाईची भीती, तर कधी सोशल मीडियावर मैत्री करून परदेशातून गिफ्ट पाठवल्याचे सांगत ही फसवणूक केली जातेय.. याशिवाय शेअर बाजारातील गुंतवणूक आणि टास्कच्या अमिषाने फसवणूक केली जाते.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विरोधात बहुजन समाजाचा निषेध मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबईमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विरोधात बहुजन समाजाने निषेध मोर्चा काढण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काही दिवसांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करण्यासाठी नवी मुंबईतील संविधान रक्षक भारतीय नागरिक यांच्यावतीने सानपाडा ते जुईनगर असा निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी अमित शाह यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे अशा घोषणा देण्यात आल्या. तसेच या निषेध मोर्चात अनेक नागरिकांनी सहभाग नोंदवला.

## ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे साईचरणी लीन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांचा श्री साईबाबा संस्थानच्या वतीने प्रशासकिय अधिकारी विश्वनाथ बजाज यांनी सत्कार केला. यावेळी श्री साईबाबा संस्थानचे जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आदी उपस्थित होते.

## जामनेर येथे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे जंगी स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** कॅबिनेट मंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आज पहिल्यांदाच जामनेर येथे आले असून त्यांचा शहरात जंगी स्वागत करण्यात आले.

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन हे निवडणुकीच्या निकाल लागल्यानंतर मुंबई व नंतर नागपूर येथे अधिवेशनामध्ये होते त्यांनी नागपूर येथे कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांना जलसंपदा खाता मिळाले असून त्यांच्या जल्लोषात स्वागत करण्यासाठी तालुक्यात व शहरात त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणावर रगोळी काढण्यात आली होती दुपारी एक वाजेपासून जामनेर शहरात त्यांच्या स्वागतासाठी तालुक्यातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते सायंकाळी त्यांचं आगमन झाल्यानंतर डीजेच्या तालावर नाचत व फटाक्याच्या आतिश बाजी करत ठीक ठिकाणी ओक्सान करण्यात आले जामनेर शहरातून त्यांची जंगी मिरवणूक काढण्यात आली यावेळी हजारो च सख्येने नागरिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर विशेष पुरस्कार




रायपूर, : पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण लोकसभेचे माजी सदस्य डॉ. नंदकुमार साय व छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर, ब्रँडिंग व भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले. छत्तीसगडमधील रायपूरच्या हॉटेल बेबीलॉन इंटरनॅशनलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ४७ व्या भारतीय जनसंपर्क परिषदेच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी ऋपीआरएसआयऋचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, डॉ. यू. एस. शर्मा, डॉ. समीर गोस्वामी, रायपूर चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. शाहीद अली यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## शंकरावजी हयात असताना आव्हाडांच्या नेत्यांनी कसा अपमान केला हे मला सांगायची गरज नाही

### आमदार जितेंद्र आव्हाडांच्या टीकेला खा. अशोक चव्हाण यांनी दिले प्रतिउत्तर

दैनिक आपला विदर्भ




**नांदेड/प्रतिनिधी :** आमदार जितेंद्र आव्हाडांच्या टीकेवर खासदार अशोक चव्हाण यांनी प्रतिउत्तर दिलं. शंकरावजी हयात असताना आव्हाडांच्या नेत्यांनी कसा अपमान केला हे मला सांगायची गरज नाही. मराठवाडातल्या सर्व जनतेला सर्वश्रुत आहे. शंकरराव चव्हाण हयात असताना राजकारणामध्ये त्रास देण्याचं काम त्यांनी आणी त्यांच्या नेत्यांनी केलं होतं. असं. अशोक चव्हाण म्हणाले.

अशोक चव्हाण यांनी भाजपा कडून केलेल्या आंदोलनाचा फोटो ट्विट करुन आव्हाड यांनी टीका केली . त्यावर चव्हाण यांनी उत्तर दीले.भाजपने जे आंदोलन केलंय ते बाबासाहेबांच्या विषयी आदर ठेऊन इतिहासात जे वास्तव आहे तेच पंतप्रधान मोदींनी,अमित शहांनी मांडलं आहे. त्यामुळे कुठल्याही गोष्टींचा विपर्यास करून अश्या पद्धतीने लोकांमध्ये गैरसमज निर्माण करणे अयोग्य आहे. असं. अशोक चव्हाण म्हणाले. शिवाय आव्हाड हे आगोदर कुठे होते राष्ट्रवादीमध्ये नंतर आले त्यांची काय भूमिका होती ,निष्ठेच्या बाबतीत त्यांनी मला शिकवण्याची गरज नाही असा टोला अशोक चव्हाण यांनी आव्हाडांना लगावला.

## विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अध्ययनाचे काम करावे - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

### शारदाश्रम विद्यामंदिरचा ७५ वा वर्धापन दिन सोहळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील दादर येथील शारदाश्रम विद्यामंदिरचा ७५ वा वर्धापन दिन सोहळा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज झाला. विद्यार्थ्यांनी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी एकाग्रतेने अध्ययनाचे काम करावे, असे त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. त्याचबरोबर कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

सायन येथील षन्मुखानंद सभागृहात आयोजित या सोहळ्यात सेवानिवृत्त मेजर जनरल नितीन गडकरी, शारदाश्रम विद्यालय शाळा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राजन गुप्ते, चेअरमन पी. बी. देसाई, सचिव गजेंद्र शेट्टी यांच्यासह माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित





होते.

यावेळी राज्यपाल म्हणाले, कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या प्रवासातील ७५ वर्षे हा मोठा टप्पा असतो. शारदाश्रम शाळेने या कालावधीत कौतुकास्पद काम केले आहे. दिलीप प्रभावळकर, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह या शाळेत शिकलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरीद्वारे शाळेचे नाव उंचावले आहे. या माजी विद्यार्थ्यांचा प्रवास प्रेरणादायी असून शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कामाप्रमाणे आपल्या अभ्यासात एकाग्रतेची आणि कठोर परिश्रम करण्याची सवय अंगिकारावी, यश नक्की मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यपाल म्हणाले, महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक थोर व्यक्तिमत्त्वांची भूमी आहे. शिवाजी महाराजांच्या आठवणी सांगून विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी अशा व्यक्तींच्या कार्यापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक विचारसरणी ठेवावी तसेच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी खेळांमध्ये अवश्य सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

श्री. गडकरी यांनी यावेळी बोलताना विद्यार्थ्यांना सेवादलाच्या माध्यमातून देशसेवेसाठी पुढे येण्यासाठी प्रेरणा दिली. तर संस्थेचे सचिव श्री. शेट्टी यांनी शारदाश्रमच्या वाटचालीबाबतची माहिती दिली.

शाळेतील दहावीच्या परीक्षेत तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त काढण्यात आलेल्या अम्ब्रोसिया या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. शाळेच्या लहान विद्यार्थ्यांनी यावेळी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचेही राज्यपालांनी कौतुक केले.

CMYK

# भाजपा नेते देवानंद सानप यांचा त्यांच्या चाहत्यांकडून गरजवंत महिलांना किराणा किट व साडी चोळी वाटुन वाढदिवस साजरा

## वाढदिवसाच्या निमित्त हृदय सत्कार व वाढदिवस साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** पत्रकार,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांचा आज दि २२ डिसेंबर रोजी ठिक ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला. सामाजिक संघटनेच्या व पत्रकार संघटनेच्या वतीने सिंदखेडराजा मतदार संघात दुसरबीड तढेगाव बीबी भुमराळा किनगाव जट्ट चिखला देऊळगाव कोळ झोटींगा खंडाळा लोणार मांडवा विरपांगरा सह इतर ठिकाणी त्यांच्या चाहत्यांनी व मित्र मंडळींनी त्याचा शाल श्रीफळ देवून हृद्य सत्कार करण्यात आला तद् नंतर बिबी येथील गरजवंत महिलांना वाढदिवसानिमित्त किराणा किट व साडी चोळी चे वाटप देवानंद सानप यांच्या चाहत्यांकडून वाटप करण्यात आले

वयाच्या १५ वर्षापासून सामाजिक कार्यातून राजकारणात आले आणि राजकारणात आल्यानंतर सर्वसामान्यांय विषयी असलेली तळमळ या कार्यातून लोकप्रियता वाढत गेली आणि अंदोलनाच्या माध्यमातून जिल्हाभर कार्यकर्ते व मित्र परिवार वाढतच गेला यातून



शेतकरी कष्टकरी मजूर अनाथ अपंगांच्या समस्या निवारण्याचे काम करून शासन दरबारी न्याय मिळवून दिला आजही ते कार्य चालू असून भविष्यात गोरगरिबांवरील अन्याय अत्याचाराच्या लढून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य चालूच ठेवणार असे देवानंद सानप यांनी सांगितले

**आमदार मनोज कायंदे, प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ, माजी आमदार तोताराम कायदे,भाजपा नेते प्रभाकर ताठे,सह अनेक पक्षातील नेत्यांनी व सामाजिक संघनटनेतील कार्यकर्त्यांनी सानप यांना शुभेच्छा दिल्या**

यावेळी पत्रकार भगवान नागरे काशिनाथ राऊत,दिनकर काकड, अशोक मुंडे,मधुकर मोहीते, रमेश खंडागळे ,भागवत आटोळे, रामप्रसाद जाधव ,रोशन चव्हाण, ऋषी दंदाले , कृष्णा पंधे,जहीर भाई,भाजपा युवा ता अध्यक्ष राम डुकरे, ता.सचिव प्रविण धाईत, व्यापारी आघाडी जि. उपाध्यक्ष गोपाल काबरा, वंचित ता. अध्यक्ष दिलीप राठोड,धनंजय कायंदे,सागर मुर्तडकर ,रंजीत सानप , आशिष अग्रवाल ,भागवत मुळे, विशाल मुर्तडकर , ऋषिकेश धाईत, मंगेश बोबडे , बाबू सिंग जोरावर सरपंच गणेश काकड ,शाम इंदोरिया, सुनिल मुंढे, गजानन मुर्तडकर , अमोल गावडे , राहुल वानखेडे, कैलास तांदुळे, प्रसाद कुलकर्णी, रामेश्र्वर काळुसे, विलास दराडे, गणेश डुकरे, गजानन गायकवाड, असंख्य चाहते व मित्र मंडळी हजर होती.

## आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!

## शेवटी आशा भोसलेंची नात ती! प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरनेही घातली हटके मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आपल्या आवाजाने सर्वांना मंत्रमुग्ध करणाऱ्या जेष्ठ गायिका म्हणजे आशा भोसले. त्यांनी एकापेक्षा एक सुपरहिट गाण्यांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलंय. आजही त्यांचा आवाज ऐकला की लोकांच्या अंगावर काटा उभा राहतो. आशा भोसले त्यांच्या गायिकीमुळे तर चर्चेत असतात पण आता त्यांचा एक व्हिडिओ समोर आलाय ज्यामध्ये त्यांच्या नातीसाठी स्थळ आल्याचे पहायला मिळतंय. हा व्हिडिओ सध्या इंटरनेटवर खळबळ उडवत आहे.

आशा भोसलेंची नात जनाई भोसलेही चर्चेत असते. मात्र नुकताच एक व्हिडिओ व्हायरल होतोय ज्यामध्ये तिला स्थळ आल्याचे पहायला मिळाले. प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएंसर अथर्व सुदामेने जनाईला मागणी घातल्याचे व्हिडिओमध्ये दिसलं.

व्हायरल व्हिडिओमध्ये दिसतंय की, अथर्वने जनाईला लग्नाची मागणी घातली. पण तिने आजी आशा भोसलेची परवानगी घेण्यास सांगितलं. मग दोघंही आशा भोसलेंकडे जातात आणि लग्नासाठी परवानगी मागतात. त्यांचा मजेशीर रील सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे.

खरं तर हा फक्त एक मजेशीर रील आहे. अथर्वने जनाईला खरोखर नाही तर फक्त रीलसाठी लग्नाची मागणी घातली आहे. हा व्हिडिओ इंटरनेटवर चांगलाच चर्चेत आहे. या रीलवर अनेक कलाकारांच्या कमेंटही आल्या. लोक या रीलचं कौतुक करत आहेत.

दरम्यान, अथर्व सुदामे प्रसिद्ध मराठी सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आहे. तो वेगवेगळ्या कलाकारांसोबत वेगवेगळे मजेशीर रील बनवत असतो. सोशल मीडियावर त्याचे रील नेहमीच ट्रेंडिंगमध्ये असतात आणि त्याचा चाहतावर्गही मोठा आहे.

## भाट्ये समुद्रकिनारी अटलबिहारी वाजपेयींचे वाळूशिल्प

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** भारतरत्न, दिवंगत पंतप्रधान, भाजपाचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून भाट्ये येथे भाजपाच्या वतीने कलाकार अमित पेडणेकर यांनी वाजपेयींचे वाळूशिल्प साकारले. या वाळूशिल्पाचे अनावरण आमदार, भाजपा नेते रवींद्र चव्हाण यांनी केले. अमित पेडणेकर यांनी जवळपास ९ ते १० तास मेहनत घेऊन हे वाळूशिल्प साकारले. अटलबिहारी वाजपेयी यांचा चेहरा साकारताना भरपूर मेहनत घ्यावी लागली. त्या शेजारी भाजपचा रंगीत ध्वजही साकारण्यात आला. कलाकार अमित पेडणेकर यांचा सत्कार रविंद्र चव्हाण यांनी केला. कलाकार पेडणेकर यांचे विशेष कौतुक यावेळी करण्यात आले. यापूर्वी त्यांनी गेल्या वर्षी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर आणि दानशूर भागोजीशेठ कीर यांचे वाळूशिल्प साकारले होते. मूर्तीकार असणारे पेडणेकर हे उत्तम कलाकार आहेत.










DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शिंदेंच्या कॉमन प्रतिमेसारखेच आमचेही ध्येय

## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : नागपूर अधिवेशनात मंत्रिमंडळात शपथविधी झाला याचा आनंद आहे. एकनाथ शिंदे यांनी नवीन जबाबदारी दिली आहे. शिंदे यांची जी प्रतिमा आहे कॉमन मॅन म्हणून आमच ही तसचं ध्येय आहे.

सामाजिक न्याय खात्यात जी आव्हान आहे ते पेलण्याचा प्रयत्न केले जाणार आहे. उद्यापासून दौरे सुरू होणारा आहे. उद्या उदय सामंत आणि मी मस्साजोग, परभणी येथे जाणार आहोत.अश्या घटना घडतील तिथे आम्ही जाणार आहे. वाढती गुंडगिरी थांबवण्यासाठी प्रयत्न करणारआहे.

किती वेळेला उत्तर देऊ? पालकमंत्री मीच होणार आहे. छ संभाजीनगर मध्ये ६ महिन्यात ज्या घटना घडल्या आहेत. ज्यात अवैध धंदे, गुंडगिरी, जमीन बळकावणे यावर आळा घालणार आहे. गुंडगिरी करणारा कुणीही असो कोणत्याही जातीचा पक्षाचा असो कारवाई केली जाईल आता कोणतही प्रकरण दाबल जाणार नाही. जो सापडेल त्याच्यावर कारवाई केली जाईल. याचा प्रत्यय एक महिन्यात येईल. गुंडगिरी थांबवून उद्योजकांना पोषक वातावरण निर्माण करणार आहे.

राज ठाकरे/ उध्दव ठाकरे भेट

लग्नात भेटले म्हणून राजकारण तापायच काही कारण नाही. हे करायचं असत तर विधानसभेत झालं असतं. राज ठाकरे यांनी त्यांना अनेक वेळा टाळी देण्याचा प्रयत्न केला परंतू उध्दव ठाकरे हात मागे घेण्याच काम केलेल आहे, त्यामुळे ते कधीही एकत्र येऊ शकत नाही जे मंत्रिपद मिळाले त्यावर समाधान आहे. जे काम करणार नाही त्यात ६ महिने १ वर्षात त्याचं मंत्रिपद जाणार आहे. कोणीही असो शासकीय निधीचा गैरवापर केला तर त्याच्यावर कारवाई केली जाईल ते मोठे नेते आहे शहराच्या ठिकाणी नाही ते मुंबईत



देखील करतील.असा दबाव कुणाचा कुणावर चालत नाही.ते म्हणाले अडीच वर्षानंतर पुन्हा येईल म्हणाले यावर वरिष्ठ निर्णय घेतली.

# कापडी पिशव्यांचे वाटप, लातूर प्लास्टिक मुक्तीसाठी नागरिकांचा पुढाकार

## संत गाडगेबाबा यांच्या स्मृतिदिनी प्लास्टिक मुक्त लातूर अभियानास प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी व लातूर शहर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी प्लास्टिकला पूर्णपणे मूठमाती देत शहरातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी पुढाकार घेतला असून, प्लास्टिक मुक्त लातूर अभियानाची सुरुवात माणूस प्रतिष्ठान संचलित माझं घर प्रकल्पातून नागरिकांना प्लास्टिकला पर्याय म्हणून कापडी पिशव्यांचे वाटप करून करण्यात आली.

संत गाडगेबाबा व ज्येष्ठ समाजवादी नेते ड मनोहरराव गोमारे यांना स्मृती दिनानिमित्त शुक्रवारी माझं घर या प्रकल्पात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.



या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक विचारवंत प्रा. सुभाष भिंगे, डॉ. गणेश पनाळे, रामराजे आत्राम, दगडू साहेब पडिले, अनिल शहा, मकबूल वलांडीकर, हरीभाऊ गायकवाड, माझं घरचे प्रमुख शरद झरे, विनोद चव्हाण राहुल लोंढे, राहुल गोरे, डी उमाकांत प्रा. माडे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थितांनी आपले विचार व्यक्त केले.

समाजामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर मोठ्याप्रमाणात वाढला असून यामुळे पर्यावरणाची प्रचंड हानी होत आहे. पर्यावरणाचे संवर्धन करायचे असेल तर प्लास्टिकच्या पिशव्यांना पर्याय म्हणून कापडी पिशव्यांचा वापर प्रभावी ठरू शकतो. महिलांकडून विनावापराच्या साड्या तसेच शाली चें संकलित करून त्यापासून पिशव्या तयार करून त्या नागरीकांना मोफत वाटप करून प्लास्टिक बंदी व पर्यावरण संवर्धन या संदर्भात जनजागृती करण्यासाठी प्लास्टिक मुक्त लातूर या अभियानाची सुरूवात सजग नागरीकांनी एकत्र येत संत गाडगेबाबा यांच्या स्मृतिदिनानिमित्त केली आहे. शुक्रवारी या अभियानाची सुरुवात म्हणून साड्यांपासून तयार केलेल्या पिशव्यांचे शंभर नागरीकांना वाटप करण्यात आले. घरा-घरात वापराविना पडून राहिलेल्या साड्यांची संख्या अधिक असते. या साड्यांपासून पिशव्या तयार करता येऊ शकतात, म्हणुन नागरिकांनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# भारतीय महिला संघाकडून विंडीजचा धुव्वा



*बडोदा : सलामीची फलंदाज स्मृती मनधानाची (१०२ चेंडूंत ९१ धावा) अप्रतिम खेळी आणि वेगवान गोलंदाज रेणुका ठाकूरच्या (५/२९) भेदक माऱ्याच्या जोरावर भारतीय महिला संघाने रविवारी झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात पाहुण्या वेस्ट इंडिज संघाचा २११ धावांनी धुव्वा उडवला.*

*भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ९ बाद ३१४ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली. याचा पाठलाग करताना विंडीजने सुरुवातीपासूनच गडी गमावले. अखेरीस विंडीजचा डाव २६.२ षटकांत १०३ धावांवरच आटोपला. रेणुकाने एकदिवसीय कारकीर्दीत प्रथमच सामन्यात पाच बळी मिळवण्याची किमया साधली. तिच्या चमकदार कामगिरीमुळे भारताने तीन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली.*

*त्याआधी, डावखुरी फलंदाज मनधानाने भक्कम पाया रचून दिल्यानंतर मधल्या फळीतील फलंदाजांनी त्यावर तीनशे धावांचा डोंगर उभा केला. मनधाना आणि पदार्पण करणाऱ्या प्रतिका रावल (६९ चेंडूत ४०) यांनी ११० धावांची सलामी दिली. मनधनाने सलग पाचव्या डावात ५० हून अधिक धावांची खेळी केली. ती बाद झाल्यावर हरलीन देओल (५० चेंडूंत ४४), कर्णधार हरमनप्रीत कौर (२३ चेंडूंत ३४), जेमिमा रॉड्रिग्ज (१९ चेंडूंत ३१) आणि रिचा घोष (१३ चेंडूंत २६) यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.*

*भारताने २११ धावांनी विजय मिळवला. एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारताचा हा दुसरा सर्वांत मोठा विजय ठरला. यापूर्वी भारताने २०१७ मध्ये आर्यलंडवर २४९ धावांनी मात केली होती. वेस्ट इंडिज महिला संघाचा हा धावांच्या फरकाने सर्वांत मोठा पराभव ठरला. यापूर्वी २०१९ मध्ये त्यांना इंग्लंडकडून २०८ धावांनी पराभव पत्करावा लागला होता.*

*संक्षिप्त धावफलक*

*भारत : २० षटकांत ७ बाद ११७ (जी. त्रिशा ५२; मिथिला विनोद १७; फरजाना इसमिन ४/३२) विजयी वि. बांगलादेश : १८.३ षटकांत सर्वबाद ७६ (जुएरिया फिरदौस २२; आयुषी शुक्ला ३/१७, सोनम यादव २/१३, पारुनिका सिसोदिया २/१२).*

# माजी खा. इम्तियाज जलील यांच्यासह ३० आंदोलकांवर गुन्हे दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्यसभेत गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्याचे पडसाद राज्यभर उमटले. राज्यात छत्रपती संभाजीनगरसह अनेक ठिकाणी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांसह विरोधक एकवटले होते. जोडे मोरो आंदोलनासह विरोधक आक्रमक झाले होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये केलेल्या आंदोलनादरम्यान गाढवाचा वापर करण्यात आल्याचा आक्षेप घेत माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यासह एमआयएम पक्षाच्या ३० आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या वक्तव्याविरोधात आंदोलन करताना जमावबंदी आदेशाचे उ'घन आणि गाढवाचा वापर केल्याप्रकरणी हे गुन्हे दाखल



झाले आहेत.

अमित शाह यांच्या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त करत जलील आणि त्यांच्या समर्थकांनी आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान गाढवाचा वापर करण्यात आला, ज्यामुळे पोलिसांनी यावर आक्षेप घेत गुन्हा दाखल केला आहे. आंदोलकांनी जमावबंदी आदेशाचे उ'घन केल्याचेही पोलिसांनी म्हटले आहे.

नक्की प्रकरण काय?

राज्यसभेत भाषण करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी केलेल्या वक्तव्यानंतर राज्यभरात विरोधक आक्रमक झाले होते. एक वक्तव्य केलं. यावेळी अमित शाह म्हणाले की, आंबेडकरांचे नाव घेणे ही एक फॅशन झाली आहे. सगळीकडे आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, म्हणायचे. ''त्यांनी देवाचे नाव इतक्या वेळा घेतले असते, तर स्वर्गात जागा मिळाली असती,'' असे शाह म्हणाले. राज्यसभेत झालेल्या संविधानावरील दोन दिवसीय चर्चेच्या समारोपात शाह यांनी मंगळवारी केलेल्या भाषणात काँग्रेसवर जोरदार ह'बोल केला होता. त्यावेळी शाह यांनी आंबेडकरांचे नाव घेणे ही फॅशन झाली असल्याचे म्हटले. यानंतर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला होता. छत्रपती संभाजीनगर येथे श्द्य कडून झालेल्या आंदोलनात गाढवाचा वापर करत जमावबंदीचे उ'घन केल्याप्रकरणी आक्षेप घेत इम्तियाज जलील यांच्यासह एम आयएमचे ३० आंदोलकांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय.एमआयएम पक्षाने या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पक्षाचे म्हणणे आहे की, हे आंदोलन शांततापूर्ण होते आणि जनतेच्या भावना व्यक्त करण्यासाठी करण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे.या घटनेमुळे छत्रपती संभाजीनगरसह राज्यभरातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. एमआयएमच्या आंदोलनावर आणि पोलिसांच्या कारवाईवर राजकीय चर्चांना उधाण आले असून या प्रकरणाचा पुढील तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

# महाविहार येथे २५ डिसेंबर रोजी सातवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्या वतीने पु. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली, पु. भिक्खु धम्म सेवक महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, रामेगाव, लातूर येथे ७ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

बुधवार रोजी संपन्न होणाऱ्या सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या सभा मंडपाचे रोपण माजी नगरध्यक्ष मा. लक्ष्मण कांबळे, साहेबराव नरवाडे,पोलीस निरीक्षक, गांधी चौक लातूर यांच्या हस्ते तर प्रा.बापू गायकवाड, डी. एस. नरसिंगे ,प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, बसवंतप्पा



उबाळे, प्रा. यु डी गायकवाड, पांडुरंग अंबुलगेकर, विश्वनाथ आल्टे, सुशील चिकटे, आंनद सोनवणे, भीमराव चौदंते, ज्योतीराम लामतुरे, मिलिंद धावारे, उदय सोनवणे, परमेश्वर आदमाने, प्रमोद देठे, सतिश मस्के इत्यादीच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.दि २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळच्या प्रथम सत्रात सकाळी ठीक ०८:०० वाजता डॉ आंबेडकर चौक बौध्द नगर येथे धम्मध्वजारोहण करून बुध्द मुर्ती सहित भिक्खु संघ उपासक उपासिका यांची लातूर शहरातून भव्य मिरवणूकीस प्रारंभ होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथे समापन होणार आहे. दुसऱ्या सत्रात दुपारी ठीक १२:०० वाजता

सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे उदघाटन श्रीलंकेचे माजी खासदार तथा राष्ट्रपतीचे धार्मिक सल्लागार पु. भिक्खु अतुरलीय रतन महाथेरो यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणेम्हणून माजी सामाजिक न्याय मंत्री तथा बावीस प्रतिज्ञा चे मुख्य प्रवर्तक मा. राजेंद्र पाल गौतम, (नवी दिल्ली) दिवंगत रोहित वेमुला (हैद्राबाद )यांच्या मातोश्री मा. राधिका वेमूला, राज्याचे नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री मा. बाबासाहेब पाटील,माजी मंत्री मा.आ. संजय बनसोडे,माजी मंत्री मा.अमित देशमुख मा.आ. अभिमन्यू पवार मा.आ.रमेशप्पा कराड, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक मा. इंजि. अनिलकुमार गायकवाड, जिल्हाधिकारी.मा.वर्षा ठाकूर, जिल्हा पोलीस अधीक्षक मा. सोमेय मुंडे, मनपा आयुक्त मा. बाबासाहेब मनोहरे,उपजिल्हाधिकारी मा.डॉ. भारत कदम,पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.डॉ. एस. पी. गायकवाड, माजी नगराध्यक्ष मा.लक्ष्मण कांबळे पोलीस निरीक्षक मा. साहेबराव नरवाडे इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व समस्त लातूरकरांच्या वतीने समाजातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, प्रशासकीय, संस्कृतीक क्षेत्रात कृतिशील योगदान देणाऱ्या व्यक्तींना प्रथमतःच राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार देण्यात येणार आहेत.याप्रसंगी देश विदेशातील भिक्खु संघाची धम्म देसना रात्री उशिरा पर्यंत होणार आहेत. तिसऱ्या सत्रात सायंकाळी उशिरा सुप्रसिद्ध विद्रोही गायिका क्रांतीशाहीर मा. शीतल साठे व मा.सचिन माळी यांचा आंबेडकरी जलसा कार्यक्रम होणार आहे.

तेंव्हा या एक दिवसीय संपन्न होणाऱ्या सातव्या अखिल भारतीय धम्म परिषदेस समस्त लातूर जिल्यातील बौद्ध उपासक उपासिकांनी पांढरे वस्त्र परिधान करून उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो व बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षक चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे...

### उदय सामंत यांचे रत्नागिरी शहरात आगमन होताच जेसीबीतून पुष्पवृष्टी करून जंगी स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांची रत्नागिरी मध्ये जंगी स्वागत केले गेले. उदय सामंत यांचे रत्नागिरी शहरात आगमन होताच जेसीबीतून पुष्पवृष्टी करून जंगी स्वागत करण्यात आले. ढोल ताशाचा गजर आणि फटाक्याच्या आतषबाजीमध्ये कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. यावेळी उदय सामंत यांनी सर्व रत्नागिरीकराना हात दाखवून अभिवादन केले. मारुती मंदिर येथून निघालेली ही भव्य मिरवणूक जयस्तंभ पर्यंत मोठ्या उत्साही वातावरणात पार पडली.

### मनमाडला शीख बांधवांचा सालाना जोडमेला





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : देशातील तिसऱ्या क्रमांकाचा शीख धर्मियांचे पवित्र मनमाड गुरुद्वारात शीख धर्मियांचे धर्मगुरू श्री गुरू गोविंद साहेब यांच्या ३५८ व्या जयंतीनिनिमित प्रकाश पर्व साजरा केले जात आहे. त्यानिमित्त सालाना जोडमेल्याचे आयोजन करण्यात आले.अखंड पाठाच्या समाप्तीनंतर. गुरु-दा-गद्दी ग्रंथ साहेबांची मिरवणूक काढण्यात आली. पंच प्यारे, पंच निशाण,भजनी मंडळ मिरवणुकीच्या अग्रभागी होते. मिरवणुकीतील लाठी-काठी, दांड-पट्टा, तलवारबाजीचे चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. अनेक वर्षापासून सालना जोडमेल्याची परंपरा सुरु आहे. देशभरातील शिख भाविकांनी हजेरी लावली होती. शहरातील विविध संस्था संघटनातर्फे जोडमेल्याचे स्वागत करण्यात आले.

### मंत्री भरत गोगावले यांचे रायगडच्या भूमीत जंगी स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी** : महाड पोलादपूर मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले हे मंत्रिपदी विराजमान होताच त्यांचे रायगडात आगमन होताच कार्यकर्त्यांकडून जोरदार स्वागत केले जातेय. खारपाडा , पेण याठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. मुंबई गोवा महामार्गावर महाड कडे जाताना भरत गोगावले यांच्या स्वागतासाठी कार्यकर्ते ठिकठिकाणी उभे राहून प्रतीक्षा करतायेत, कार्यकर्त्यांत प्रचंड जोश व उत्साह पहायला मिळतोय. फटाक्यांची आतिषबाजी करून गोगावले यांचे औक्षण व स्वागत करण्यात आले.



# कंटेनर कारवर पलटी होऊन भीषण अपघात; एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**सांगली / प्रतिनिधी :** देशभरात दररोज अपघाताच्या अनेक घटना घडताना पाहायला मिळातात. आता बंगळुरुमधील नेलमंगळा तालुक्यातील बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना शनिवारी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली. या अपघातात एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृत कुटुंब हे सांगलीच्या जत तालुक्यातील मोरबगी गावचे होते अशी माहिती सांगितली जाते. एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाल्यामुळे मोरबगी गावावर शोककळा पसरली आहे.

हे कुटुंब ख्रिसमसच्या सुट्टी निमित्ताने बेंगळुरूवरून जतकडे आपल्या गावी जात होते. मात्र, गावाकडे जात असताना एक कंटेनर त्यांच्या चारचाकी गाडीवर अचानक पलटी




झाल्यामुळे एका आयटी इंजिनिअरसह ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामध्ये चंद्रम इप्पाळगोळ, त्यांची पत्नी गौराबाई (४० वर्षे), त्यांची मुले ज्ञान (१६ वर्षे) आणि दीक्षा (१० वर्षे), त्यांची मेहुणी विजयालक्ष्मी (३५ वर्षे) आणि त्यांची भाची आर्या (६ वर्षे) अशी मृतांची नावे आहेत. चंद्रम इप्पाळगोळ हे मूळ सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील मोरबागी गावाचे रहिवासी होते. चंद्रम इप्पाळगोळ हे बंगळुरू येथे एका सॉफ्टवेअर कंपनीत सीईओ होते. त्यांचे कुटुंब देखील त्यांच्याबरोबर बेंगळुरू येथे राहत होते. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

बेंगळुरू ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रम इप्पाळगोळ आणि त्याचे कुटुंब कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील मोरबागी येथील त्यांच्या गावी जात होते. ते त्यांच्या आजारी वडिलांना भेटायला आणि ख्रिसमस सुट्टीनिमित्त जात होते. मात्र, एक भरधाव कंटेनर ट्रक त्याच्या गाडीवर येऊन पलटी झाला. चंद्रम इप्पाळगोळ यांनी दोन महिन्यांपूर्वीच चारचाकी गाडी खरेदी केली होती.

माहितीनुसार, समोरून येणाऱ्या दुसऱ्या एका वाहनाला वाचवण्याच्या प्रयत्नात चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव वेगात जात या ट्रकने विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारला धडक दिली. यामध्ये त्या कारमधील ६ जणांचा मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करत अधिक तपास सुरु केला आहे. तसेच ट्रकच्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रकचा चालकही गंभीर जखमी झाला असून त्याच्यावरही रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

## विविध वृत्त...

### पालकमंत्री पदावर दावा केला नाही, पण पक्ष जे आदेश देईल ते काम मी करेन -कामगार मंत्री फुंडकर



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर आज प्रथमच जिल्ह्यात आले असता, त्यांनी शेगांव चे संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. त्यांचे सोबत त्यांचे कुटुंब ही होते. कामगार मंत्रालय फार मोठे असून कामगारांचे प्रश्न सोडवायचे आहेत, बेरोजगारांना काम द्यायचे आहे, अशी भावना फुंडकर यांनी व्यक्त केली असून पालकमंत्री पदावर आपण दावा केला नसून पार्टी जो आदेश देईल ते काम मी करत असतो, अशी प्रतिक्रिया फुंडकर यांनी दिलीय. यावेळी माजी मंत्री तथा जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ संजय कुटे हे देखील त्यांच्यासोबत उपस्थित होते.



### अर्धा डझन खाते मिळलेले राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे यवतमाळ येथे जल्लोषात स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ / प्रतिनिधी :** राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारात पुसदचे आमदार इंद्रनील नाईक यांना राज्यमंत्री म्हणून अर्धा डझन खाते मिळाले आहे. आज त्यांचे यवतमाळ शहरातील नेताची चौकात जल्लोषात स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे त्यांना जल व मृदू जलसंधारण खाते मिळाले आहे. माजी मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांनी देखील याच खात्याचे मंत्रिपद सांभाळले आहे. तेच खाते इंद्रनील नाईक यांच्या कडे आले आहे. या खात्यात न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### मंत्री आकाश फुंडकरांची शेगाव शहरात मोठी रॅली !



दैनिक आपला विदर्भ

**शेगाव / प्रतिनिधी :** कामगार मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आज रविवारी जिल्ह्याचे सुपुत्र खामगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲडव्होकेट आकाश फुंडकर हे जिल्ह्यात दाखल झाले. सर्वप्रथम त्यांनी विदर्भाची पंढरी म्हणून मानल्या जाणाऱ्या संत नगरी शेगावात दाखल होऊन गजाननाचे दर्शन घेतले. यानंतर शहरातील विविध कार्यक्रमांना उपस्थिती दिली. यावेळी श्री गजानन महाराज मंदिर परिसरातून विश्राम भवनापर्यंत ना.फुंडकरांची ओपनकार मध्ये मिरवणूक रॅली काढण्यात आली. यावेळी या भागाचे आमदार डॉ संजय कुटे आणि ना. आकाश फुंडकर यांनी नागरिकांना अभिवादन करीत स्वागत सत्कार स्वीकारले.

### संगमनेरमध्ये बिबट्याने युवकाच्या शरीराचे तोडले लचके, युवक ठार

**संगमनेर / प्रतिनिधी :** बिबट्याने केलेल्या हल्लयात एका ३४ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. रामनाथ सूर्यभान गुरुकुले ( रा.सावरगाव तळ ) असे मयत युवकाचे नाव आहे. गुरुकुले यांच्या छातीपासून डोक्यापर्यंतचा सर्व भाग लचके तोडत बिबट्याने खाऊन टाकला. संगमनेर तालुक्यात बिबट्याच्या हल्लयात मानवी बळी जाण्याची या वर्षातली ही चौथी घटना ठरली.

हिवरगाव पावसा शिवारात एका ठिकाणी एक दुचाकी उभी केलेली असून शेजारी चपला पडलेल्या आहेत आणि रक्ताचे डागही पडलेले आहेत, अशी माहिती तेथील रहिवाशांनी संगमनेर पोलिसांना दिली होती. तालुका पोलीस ठाण्यातील पोलिस हवालदार अमित महाजन, आशिष आरवडे, संगमनेर वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन लोंढे हे देखील तेथे पोहोचले. पोलिसांनी दुचाकी उभ्या असलेल्या ठिकाणापासून काही अंतर पुढे जाऊन पाहत असताना गवताला, दगडांना रक्ताचे डाग लागलेले दिसले. त्यानंतर छिन्नविछिन्न अवस्थेत एकाचा मृतदेह त्यांना आढळून आला. शरीरावरील अनेक ठिकाणी गंभीर जखमा झालेल्या होत्या. छातीपासून डोक्यापर्यंतचा भाग पूर्णतः लचके तोडून खाल्ल्याचे दिसून आले. संबंधितांची ओळख पटवण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता त्याचे नाव रामनाथ गुरुकुले असल्याचे निष्पन्न झाले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मूर्तिकारांना पुढील वर्षीही शाडूची माती मोफत देणार


दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** पुढील वर्षीचा गणेशोत्सवही पर्यावरणपूरक व्हावा याकरीता मुंबई महापालिकेने मुर्तिकारांना शाडूची माती व जागा मोफत उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे. गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी मुंबई महापालिकेने आयोजित केलेल्या बैठकीत पालिका प्रशासनाने ही माहिती दिली. मात्र पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी केवळ माती देऊन जबाबदारी झटकता येणार नाही तर या विषयाचे राजकारण थांबवले पाहिजे असे मत मूर्तीकारांच्या संघटनेने व्यक्त केले आहे.



केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींवर २०२० मध्ये बंदी घातली होती. मात्र विविध कारणांमुळे या निर्णयाची अंमलबजावणी लांबणीवर पडली. बंदी घालून चार वर्षे झाली तरी सार्वजनिक मंडळे आणि मूर्तिकार यांना पीओपीच्या वापरापासून प्रवृत्त करण्यासाठी राज्य सरकारसह अन्य यंत्रणा अपयशी ठरल्यावरून उच्च न्यायालयाने महापालिका, राज्य सरकार यांच्या भूमिकेवर वारंवार ताशेरे ओढले होते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तोंडावर दरवर्षी पीओपी बंदीचा विषय पुन्हा चर्चेत येत असतो. पुढील वर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा म्हणून पालिकेने आतापासून नियोजन सुरू केले असून याबाबतची एक प्राथमिक बैठक गेल्या आठवड्यात पार पडली. या बैठकीला गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, गणेशोत्सव समन्वय समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पीओपीला सक्षम पर्याय देण्याकरीता सीपीसीबीसह एक बैठक घेण्याचा ठराव करण्यात आला. तसेच या बैठकीत पुढील वर्षाकरीता मुंबई महापालिकेतर्फे मूर्तीकारांना पर्यावरणपूरक मूर्ती घडवण्यासाठी मोफत जागा व शाडूची माती देण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त प्रशांत सपकाळे यांनी दिली.

### उद्धव- राज ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चेला उधाण; कौटुंबिक कार्यक्रमात भेट



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** कौटुंबिक कार्यक्रमानिमित्त शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांची भेट झाल्याने हे दोनही राजकीय नेते एकत्र येत असल्याच्या चर्चांना उधाण आले. राज ठाकरे यांचे भाचे यश देशपांडे यांच्या लग्न सोहळ्यासाठी उद्धव ठाकरे उपस्थित राहिल्याने तसेच दोघांमध्ये संवाद रंगल्याने दोघे एकत्र येण्याच्या चर्चेला पुन्हा सुरुवात झाली.

विधानसभा निवडणुकीत मनसेचा पार धुव्वा उडाला तर शिवसेनेचीही पीछेहाट झाली. यानंतर लगेचच ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली होती. विधानसभा निवडणूक प्रचारात राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर पहिला गद्दार अशी टीका केली होती. उद्धव ठाकरे यांनीही राज ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले होते.

### भारतीय प्रशासन सेवेत दाखल झालेल्या २३ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्य सरकारच्या सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) दाखल झालेल्या २३ अधिकाऱ्यांना नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. अमरावती विभागाचे उपायुक्त संजय पवार यांची चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदू बेडसे यांची छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक विकास अयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

उपसभापती नीलम गोऱ्हे यांचे खासगी सचिव रवींद्र खेबुडकर यांची नियुक्ती मंत्रालयात अल्पसंख्याक विकास विभागाचे उपसचिवपदी करण्यात आली आहे. नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले निलेश सागर हे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारीपदी, तर लक्ष्मण भिका राऊत हे बालहक्क सुरक्षा आयोगाचे सचिव झाले आहेत. कल्याण-डोंबिवलीच्या स्मार्ट शहराच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी माधुरी सरदेशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. ज्योत्स्ना पडियार यांची अर्थ व सांख्यिकी आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# मुंबईत महिनाअखेरीपर्यंत गारठा कायम राहणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील इतर ठिकाणांप्रमाणे पहाटेच्या वेळी गोठवणारा गारठा मुंबईत फारसा नसला तरी मागील दोन तीन दिवसांपासून गारवा जाणवत आहे. तापमानातील ही घट डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मुंबईत शनिवारच्या तुलनेत रविवारी सकाळी किमान तापमान अल्पशी वाढ झाली असली तरी उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे सकाळचा गारठा कायम आहे.

हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात रविवारी २१.५ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात २० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. तर येथील कमाल तापमान कुलाबा केंद्रात ३०.४ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात ३०.२ अंश सेल्सिअस इतके होते. सांताक्रूझ, गोरेगाव, कांदिवली पूर्व, मुलुंड पूर्व, जोगेश्र्वरी-विक्रोळी लिंक रोड, भांडुप या परिसरात अधिक गारठा होता. दिवसभर कोरड्या वाऱ्यांचा प्रभाव कायम असल्याने उपनगरांमध्ये गारठा अधिक जाणवत होता. दरम्यान, डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत तापमानातील घट कायम राहणार आहे. मुंबई शहर तसेच उपनगरांत दिवसभर गार वाऱ्यांचा अनुभव येणार आहे. त्यामुळे पहाटे, दुपारी आणि सायंकाळीही थंडी राहील. त्याचबरोबर दाट धुके राहण्याची शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे. या कालावधीत कमाल तापमान



३०-३२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५-१९ अंश सेल्सिअस इतके राहील. आकाश अंशतः ढगाळ असेल.

गेले अनेक दिवस मुंबईच्या हवेची सरासरी नोंद 'मध्यम' असली तरी काही भागांतील हवा वाईट नोंदवली गेली आहे. समीर पच्या नोंदीनुसार रविवारी मालाड, माझगाव, नेव्ही नगर कुलाबा , बोरिवली, देवनार आणि कांदिवली या भागात 'वाईट' हवेची नोंद झाली. तेथील हवा निर्देशांक अनुक्रमे २६४, २५०,२६८, २६८, २१०, २२४ इतका होता.

# आता पॉपकॉर्नवरही जीएसटी, चवीनुसार कर द्यावा लागणार!


दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** चित्रपटगृहांमध्ये चित्रपट पाहायला जाणारे बहुसंख्य लोक पॉपकॉर्न देखील खरेदी करतात. पॉपकॉर्न खात चित्रपटाचा आनंद घेतात. मात्र, लोकांचा हा आनंद आता महागणार आहे. राजस्थानच्या जैसलमेर येथे जीएसटी (वस्तू व सेवा कर) परिषदेची ५५ वी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पॉपकॉर्नवर कर लावण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. परिषदेने पॉपकॉर्नच्या फ्लेवरनुसार (चवीनुसार) त्यावर कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच अर्थ वेगवेगळ्या फ्लेवरच्या पॉपकॉर्नवर वेगवेगळा जीएसटी आकारला जाईल. जीएसटी परिषदेने पॉपकॉर्नवर तीन प्रकारचे जीएसटी रेट्स लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. जैसलमेरमध्ये झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत पॉपकॉर्नवर जीएसटी लावण्याच्या प्रस्तावावर सहमती झाली असून रेडी टू इट पॉपकॉर्नवरील कराबाबत संपूर्ण तपशील जारी करण्यात आला आहे.

मीठ व मसाल्यांचा वापर करून तयार केलेले पॉपकॉर्न जे पॅक केलेलं नसेल आणि ज्यावर लेबल नसेल त्यावर ५ टक्के जीएसटी आकारला जाईल. दुसऱ्या बाजूला मीठ व मसाला वापरून तयार केलेले तेच पॉपकॉर्न पॅक केले व त्यावर लेबल लावलं असेल (पॅकेज्ड फ्लेवर्ड पॉपकॉर्न) तर त्यावर १२ टक्के जीएसटी आकारला जाईल. साखर व फ्लेवर वापरलेले पॉपकॉर्न आणखी महाग होणार आहे. कॅरमेलसारख्या साखरेपासून तयार केलेले पॉपकॉर्न शुगर कन्फेक्शनरी श्रेणीत ठेवण्यात आले असून त्यावर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल.

**विमा हप्त्यांवर दिलासा नाही**

यावेळी होणाऱ्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत आरोग्य आणि जीवन विमा हप्त्यावरील वस्तू आणि सेवा करात सूट अथवा त्यात कपात करण्याचा निर्णय घेतला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, जीएसटी परिषदेने हा निर्णय लांबणीवर टाकला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत या संबंधाने नियुक्त मंत्रिगटाला कोणताही निर्णय घेण्यासाठी आणखी वेळ हवा असून, त्याने त्यांच्या शिफारशी बैठकीपुढे ठेवल्याचं नाहीत. मंत्रिगटाने १४८ वस्तूंवरील करामध्ये दरबदल करण्याची शिफारस केली आहे. सध्या, जीवन व आरोग्य विम्यावर भरलेल्या हप्त्यावर १८



टक्के दराने जीएसटी आकारला जातो. मंत्रिगटापुढे, यात सूट देण्यासह, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा व मुदतीच्या जीवन विम्यावरील करात सूट देण्याची तसेच ५ लाख रुपयांच्या आरोग्य विम्याच्य संरक्षणावरील ५ टक्के कर दर कमी करण्याबाबत शिफारस देण्यास सांगण्यात आले होते.